आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१३ एप्रिल २०२६ - सोमवार

**ठळक बातम्या**

- नारी शक्ती वंदन अधिनियमातल्या सुधारणा हा या शतकातला सर्वात मोठा निर्णय असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन, महिला आरक्षण प्रस्तावाच्या चर्चेची वेळ आणि मतदारसंघ पुनर्रचना प्रस्तावाला काँग्रेसचा आक्षेप

- MPSCच्या माध्यमातून आणखी १०० संवर्गातल्या पदांची भर्ती करण्याचा राज्य सरकारचा निर्णय

- ठाणे जिल्ह्यात मुरबाडजवळ झालेल्या रस्ते अपघातात ११ जणांचा मृत्यू

- भोंदू अशोक खरातशी संबंधित नाशिक, पुणे आणि शिर्डीतल्या ठिकाणांवर ईडीचे छापे

आणि

- ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या अंत्यदर्शनासाठी चाहत्यांची रीघ

**<><><><><>**

नारी शक्ती वंदन अधिनियमात सुधारणा करुन २१ व्या शतकातला सर्वात मोठा निर्णय भारत घेणार आहे. त्यासाठी सर्वांनी पाठिंबा द्यावा असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्लीत आयोजित नारी शक्ती वंदन संमेलनात ते बोलत होते. महिलांच्या सहभागाने देशातली लोकशाही बळकट होत असल्यानं या आरक्षणाची गरज आहे. राष्ट्रपतींपासून प्रधानमंत्री पद भूषवताना या देशात महिलांनी स्वतःची अमीट छाप उमटवली असल्याचंही ते म्हणाले. १६ ते १८ एप्रिलच्या दरम्यान संसदेत नारी शक्ती वंदन अधिनियमातल्या सुधारणांवर चर्चा होणार आहे, असं ते म्हणाले. गेल्या अनेक वर्षांपासून राजकारणात महिलांना आरक्षण देण्याचा मुद्दा चर्चिला जात होता आणि सर्वच राजकीय पक्षांनी या दिशेनं प्रयत्न केल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. २०२३ मध्ये या अधिनियमाला मंजुरी दिली तेव्हा सर्वच राजकीय पक्षांनी याला पाठिंबा दिला होता याची आठवण त्यांनी यावेळी केली.

**- - होल्ड प्रधानमंत्री बाइट - - -**

२०२९ च्या निवडणुकांपासून या निर्णयाची अंमलबजावणी करावी अशी मागणी विरोधी पक्षांसह सर्वांनी केली. त्या दिशेनं सरकारनं प्रयत्न सुरू केले होते आणि विविध घटनातज्ञांशीही चर्चा सुरू होती, असं प्रधानमंत्री म्हणाले.

<><><><><>

लोकसभा आणि विधानसभेत महिला आरक्षणापेक्षाही मतदारसंघांची फेररचना हा अधिक गंभीर मुद्दा असल्याचं काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी यांनी म्हटलं आहे. फेररचनाविषयक प्रस्ताव अत्यंत धोकादायक आणि संविधानातल्या तरतुदींचं हनन करणारा असल्याची टीका त्यांनी वृत्तपत्रात लेख लिहून केली आहे.

लोकसभा आणि विधानसभांमधे महिलांसाठी ३३ टक्के जागा राखीव ठेवण्यासाठीचं विधेयक नारी शक्ती वंदन अधिनियम, २०२३ मधेच मंजूर झालं. २०२४ च्या निवडणुकांपासूनच या सुधारणा लागू करण्याची मागणी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केली होती. पण सरकारनं ती फेटाळून लावली याची आठवण त्यांनी यावेळी करुन दिली. आगामी जनगणना आणि जनगणनेवर आधारित मतदारसंघ फेररचना झाल्यावरच नवीन सुधारणा लागू झाल्या पाहिजेत अशी विरोधकांची मागणी असल्याचं गांधी यांनी नमूद केलं.

जातनिहाय जनगणना करण्यासाठी टाळाटाळ करायची हाच केंद्र सरकारचा खरा हेतू असल्याचा आरोप सोनिया गांधी यांनी केला आहे. पश्चिम बंगाल आणि तमिळनाडूमधे विधानसभा निवडणुका ऐन भरात असताना महिला आरक्षण विधेयकावरुन विरोधकांवर दबाव आणण्याचा हा प्रयत्न असल्याचं त्यांनी या लेखात लिहिलं आहे.

<><><><><>

विविध पदांच्या भर्ती प्रक्रियेत सुधारणा करायचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. त्यानुसार आता राज्य लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून ५३ ऐवजी १५३ संवर्गातल्या पदांची भर्ती केली जाईल, असा निर्णय राज्य मंत्रिमंडळानं आज घेतला. MPSC कडून होणाऱ्या संयुक्त परीक्षेत आणखी काही सेवांचा समावेश होणार असून भरती प्रक्रीया सुलभ केली जाणार आहे. याशिवाय युपीएससीच्या धर्तीवर महाजॉब्स पोर्टलद्वारे निपुण सेतू उपक्रम राबवला जाणार आहे.

आकांक्षित जिल्हा कार्यक्रमात हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे आणि परभणी या आणखी सहा जिल्ह्यांचा समावेश करायला मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. सध्याच्या २७

आकांक्षित तालुक्यांसह नवीन १५० अशा एकूण १७७ तालुक्यांमध्ये ही योजना राबवली जाणार आहे. नाबार्डच्या माध्यमातून सागरी जिल्ह्यांमध्ये मच्छिमारांसाठी मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याकरता ६१ कोटी २४ लाख रुपयांच्या निधीला मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. तसंच महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या प्रशासन आणि संस्थात्मक रचनेत बदल करायलाही मान्यता दिली. यानुसार परिषदेमधल्या सदस्यांची नियुक्ती निवडणुकीऐवजी शासनाकडून नामनिर्देशन पद्धतीनं होणार आहे.

<><><><><>

ठाणे जिल्ह्यात कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर मुरबाडजवळ आज सकाळी सिमेंट मिक्सर आणि खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनाची टक्कर होऊन झालेल्या अपघातात ११ प्रवाशांचा मृत्यू झाला, तर १ जण गंभीर जखमी झाला. हे वाहन मुरबाडहून कल्याणला जात होतं.

<><><><><>

नाशिक जिल्ह्यातल्या इगतपुरी तालुक्यातल्या वैतरणा धरण क्षेत्रात दोन वेगवेगळ्या ठिकाणी पर्यटनासाठी आलेले चार विद्यार्थी बुडाले. झारवड इथं दोन विद्यार्थी तर दुगारवाडी धबधब्यावर दोन जण बुडाले.

<><><><><>

सक्तवसुली संचालनालयानं मनी लॉन्डरिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत भोंदूबाबा अशोक खरात आणि इतरांविरुद्ध कारवाई सुरू केली आहे. नाशिकमधल्या ५, पुण्यातल्या ३, आणि शिर्डीतल्या ३ ठिकाणी आज सकाळपासून छापेमारी सुरू आहे. ही कारवाई नाशिक जिल्ह्यातल्या सरकारवाडा पोलीस ठाण्यात नोंद झालेल्या खंडणी, धार्मिक फसवणूक, औषधांचा वापर करून केलेले अत्याचार तसंच महिलांसह पीडितांवरच्या गुन्ह्यांच्या प्रकरणाशी संबंधित आहे. खरात यानं नाशिक जिल्ह्यातल्या दोन सहकारी पतसंस्थांमध्ये विविध व्यक्तींच्या नावानं अनेक बँक खाती उघडली होती. मात्र, या सर्व खात्यांमध्ये त्यानं स्वतःला वारसदार म्हणून नोंदवलं होतं, तसंच सर्व बनावट खात्यांवर नियंत्रण ठेवता यावं यासाठी स्वतःचा मोबाईल क्रमांकही जोडला होता, असं प्राथमिक चौकशीत समोर आलं आहे.

<><><><><>

मराठा आंदोलकांविरुद्ध नोंदवण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याची मागणी मनोज जरांगे यांनी आज पुन्हा केली. आंदोलन मागं घेण्यासंदर्भातला शब्द पाळला नाही, तर पुन्हा मोठं आंदोलन उभारू असा इशारा त्यांनी दिला आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेण्यासाठी चित्रपट क्षेत्रातले सेलिब्रिटी, राजकीय नेते तसंच सर्वसामान्य नागरिक यांची सकाळपासून गर्दी झाली आहे. राज्यपाल जिष्णू देव वर्मा, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख, हेलन, अभिनेत्री तबू, संगीतकार ए आर रेहमान, गायिका अनुराधा पौडवाल, गायक सुदेश भोसले, क्रिकेटपटू सचिन तेंडूलकर यांच्यासह अनेक मान्यवरांनी आशा भोसले यांच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेतलं.

चार वाजता दादर इथल्या शिवाजी पार्क स्मशानभूमीत पार्थिवावर अंत्यसंस्कार केले जातील. त्यांचं निवासस्थान आणि शिवाजी पार्क परिसरात पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला आहे. अनेक ठिकाणी आशा भोसले यांना आदरांजली वाहणारे बॅनर्स लावण्यात आले असून त्यांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

**<><><><><>**

इराणमधे उत्पादित झालेल्या कच्च्या तेलाचे टँकर्स भारतातल्या बंदरांवर आले आहेत. शिप ट्रॅकिंग डेटामधून आज ही माहिती समोर आली आहे. तब्बल ७ वर्षांनंतर इराणचं कच्च तेल भारतात आलं आहे. सुमारे २० लाख बॅरल क्रूड ऑईल घेऊन फेलिसिटी जहाज गुजरातच्या सिक्का बंदरावर पोहोचलं असून जया हे जहाज ओदिशातल्या पारादीप बंदरावर पोहोचलं आहे. इराणकडून तेल खरेदी केल्याबद्दल अमेरिकेने लावलेल्या वाढीव आयातशुल्कात सूट मिळाल्याच्या कालावधीत ही जहाजं इराणच्या खरग बेटावरुन निघाली होती.

**//<><><><><>//**